भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# प्रजाक्षोभक सभा प्रतिबंध अधिनियम, १९११

( १९११ चा अधिनियम क्रमांक १० )

[१ जुलै, १९८० रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Prevention of Seditious Meetings Act, 1911

(Act No. 10 of 1911)

**[As in force on the 1st July, 1980]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले.

१९८१

[ किंमत ५० पैसे ]

## अनुकूलन आदेशांची सूची

१. ‘ भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन)आदेश, १९३७. ’

२. ‘ विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६. ’

# प्रजाक्षोभक सभा प्रतिबंध अधिनियम, १९११

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. उद्घोषित क्षेत्रे अधिसूचित करण्याची राज्य शासनाची शक्ती.

३. व्याख्या.

४. सार्वजनिक सभांची नोटीस देणे.

५. सार्वजनिक सभांवर बंदी घालण्याची शक्ती.

६. शिक्षा.

७. सार्वजनिक ठिकाणी भाषणे दिल्याबद्दल शिक्षा.

८. अपराधांची दखल घेणे.

९. [निरसित.]

# प्रजाक्षोभक सभा प्रतिबंध अधिनियम, १९११

(१९११ चा अधिनियम क्रमांक १०)

[२२ मार्च, १९११]

**प्रजाक्षोभास प्रवर्तक किंवा सार्वजनिक शांततेस बाधक ठरण्याची शक्यता असणाऱ्या अशा सार्वजनिक सभांना प्रतिबंध करण्यासंबंधीचा कायदा एकत्रित व विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, प्रजाक्षोभास प्रवर्तक किंवा सार्वजनिक शांततेस बाधक ठरण्याची शक्यता असणाऱ्या अशा सार्वजनिक सभांना प्रतिबंध करण्यासंबंधीचा कायदा एकत्रित व विशोधित करणे समयोचित आहे ; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :––

**संक्षिप्त नाव व विस्तार.**

१. (१) या अधिनियमास 'प्रजाक्षोभक सभा प्रतिबंध अधिनियम, १९११' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [1][१ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी भाग ख राज्यात समाविष्ट असलेली राज्यक्षेत्रे] खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे, परंतु राज्य शासन वेळोवेळी **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करील अशा राज्यांमध्ये किंवा त्या राज्यांच्या अशा भागांमध्येच तो जारी होईल.

**उद्घोषित क्षेत्रे अधिसूचित करण्याची राज्य शासनाची शक्ती.**

२. (१) जेथे हा अधिनियम त्या त्या काळी जारी असेल तो संपूर्ण प्रांत अथवा त्या प्रांताचा कोणताही भाग हे उद्घोषित क्षेत्र असल्याचे शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे [2] * * * घोषित करू शकेल.

(२) पोटकलम (१) खाली काढलेली अधिसूचना ही सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ अंमलात राहणार नाही, परंतु राज्य शासनाला योग्य वाटेल त्याप्रमाणे, वेळोवेळी त्याच क्षेत्राच्या बाबतीत [2] * * * आणखी कोणत्याही अधिसूचना काढण्यास या पोटकलमातील कोणतीही गोष्ट राज्य शासनाला प्रतिबंध करते असे मानले जाणार नाही.

**व्याख्या.**

३. (१) या अधिनियमात "सार्वजनिक सभा" या शब्दप्रयोगाचा अर्थ, जनतेकरता किंवा जनतेपैकी कोणत्याही वर्गाकरता किंवा भागाकरता खुली असेल अशी कोणतीही सभा असा आहे.

(२) एखादी सभा ही खाजगी जागेत भरवलेली असली तरीसुद्धा आणि प्रवेश फक्त तिकीटधारकांपुरताच किंवा अन्यथा मर्यादित केलेला असला तरीसुद्धा, ती सार्वजनिक सभा ठरू शकेल.

**सार्वजनिक सभांची नोटीस देणे.**

४. (१) अशांततेला किंवा लोकक्षोभाला कारणीभूत होण्याची शक्यता असेल अशा कोणत्याही विषयाच्या पुर:सरणासाठी किंवा चर्चेसाठी अथवा अशा कोणत्याही विषयाशी संबंधित असे कोणतेही लिखाण किंवा छापील साहित्य याच्या प्रदर्शनासाठी किंवा त्याचे वाटप करण्यासाठी कोणतीही सार्वजनिक सभा उद्घोषित क्षेत्रामध्ये भरवावयाची झाल्यास––

(क) अशा तऱ्हेची सभा भरवण्याच्या उद्देशाची आणि अशा सभेची वेळ व ठिकाण कळवणारी लेखी नोटीस जिल्हा दंडाधिकाऱ्याला किंवा, प्रकरणपरत्वे, पोलीस आयुक्ताला तीन दिवस अगोदर दिल्याखेरीज ; किंवा

(ख) अशा तऱ्हेची सभा भरवण्यासाठी जिल्हा दंडाधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे, पोलीस आयुक्त याच्याकडून लेखी परवानगी मिळविल्याखेरीज,

अशी सार्वजनिक सभा भरवता येणार नाही.

**प्रतिवृत्त टिपून घ्यावयास लावण्याची दंडाधिकाऱ्याची शक्ती.**

(२) जिल्हा दंडाधिकारी किंवा यासंबंधात जिल्हा दंडाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला प्रथम वर्गाचा इतर कोणताही दंडाधिकारी हा लेखी आदेशाद्वारे, हवालदारापेक्षा कमी दर्जा नसलेल्या एका किंवा अधिक पोलीस अधिकाऱ्यांना किंवा अन्य व्यक्तींना अशा तऱ्हेच्या सभांना हजर राहून तेथील कामकाजाचे प्रतिवृत्त टिपण्यासाठी प्रतिनियुक्त करू शकेल.

**अपवाद.**

(३) कोणत्याही सांविधिक किंवा अन्य स्पष्ट वैध प्राधिकारान्वये भरवण्यात आलेल्या कोणत्याही सार्वजनिक सभेला किंवा शेरीफने बोलाविलेल्या सार्वजनिक सभांना किंवा राज्य शासनाने त्या प्रयोजनार्थ सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे सूट दिलेल्या कोणत्याही सार्वजनिक सभांना किंवा अशा कोणत्याही वर्गातील सार्वजनिक सभांना या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

---

१ विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे "भाग ख राज्ये" याऐवजी घातले.

२ भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलच्या पूर्वमंजुरीने" हे शब्द निरसित.

**सार्वजनिक सभांवर बंदी घालण्याची शक्ती.**

५. उद्‌घोषित क्षेत्रामध्ये व्हावयाच्या एखाद्या सार्वजनिक सभेमुळे आपल्या मते प्रजाक्षोभाचे किंवा सरकारविषयक अप्रीतीचे प्रवर्तन होण्याची किंवा सार्वजनिक शांततेला बाध येण्याची शक्यता असेल तर, जिल्हा दंडाधिकारी किंवा पोलीस आयुक्त कोणत्याही वेळी, लेखी आदेशाद्वारे अशा सभेवर बंदी घालू शकेल, मात्र त्याबद्दल तत्काळ जाहीर नोटीस द्यावी लागेल.

**शिक्षा.**

६. (१) कलम ४ च्या उपबंधांच्या विरुद्ध उद्‌घोषित क्षेत्रात भरवण्यात आलेल्या एखाद्या सार्वजनिक सभेचे प्रवर्तन किंवा संचालन करण्यात भाग घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा होतील.

(२) कलम ५ खाली बंदी घातलेली कोणतीही सार्वजनिक सभा ही 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)—प्रकरण ८ वे आणि 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५)—प्रकरण ९ वे याच्या अर्थानुसार बेकायदेशीर सभा असल्याचे मानण्यात येईल.

**सार्वजनिक ठिकाणी भाषणे दिल्याबद्दल शिक्षा.**

७. कलम ४ च्या उपबंधांप्रमाणे भरवलेली किंवा त्यापासून सूट मिळालेली सार्वजनिक सभा सोडून एरव्ही, जर कोणी उद्‌घोषित क्षेत्रातील एखाद्या सार्वजनिक ठिकाणी किंवा सार्वजनिक रावत्याच्या ठिकाणी जिल्हा दंडाधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे, पोलीस आयुक्त याच्याकडून आगाऊ मिळविलेल्या लेखी परवानगीशिवाय कोणत्याही विषयावर असे कोणतेही व्याख्यान, अभिभाषण किंवा भाषण दिले, की ज्यामुळे त्यावेळी उपस्थित असलेल्या लोकांत अशांतता माजण्याची किंवा लोकक्षोभ घडून येण्याची शक्यता आहे, तर अशा व्यक्तीला वॉरंटाशिवाय अटक करता येईल आणि तिला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास किंवा, द्रव्यदंड, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**अपराधांची दखल घेणे.**

८. इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी यांच्या न्यायालयाहून कनिष्ठ अशा कोणत्याही न्यायालयाला या अधिनियमाविरुद्ध घडलेल्या अपराधाची संपरीक्षा करता येणार नाही.

९. [निरसित.] 'निरसन अधिनियम, १९२७' (१९२७ चा १२)—कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

# THE PREVENTION OF SEDITIOUS MEETINGS ACT, 1911

## प्रजाक्षोभक सभा प्रतिबंध अधिनियम, १९११

## इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| address .. .. | अभिभाषण | [ S. 7 ] |
| cause a disturbance of the public tranquillity | सार्वजनिक शांततेला बाध आणणे | [ S. 5 ] |
| disturbance .. .. | अशांतता | [ S. 4 (1) ] |
| disturbance of public tranquillity | सार्वजनिक शांततेला बाध येणे | [Long title ] |
| head constable .. .. | हवालदार | [ S. 4 (2) ] |
| lecture .. .. | व्याख्यान | [ S. 7 ] |
| place of public resort .. | सार्वजनिक राबत्याचे ठिकाण | [ S. 7 ] |
| promote sedition .. | प्रजाक्षोभाचे प्रवर्तन करणे | [ Long title ] |
| promote sedition or disaffection | प्रजाक्षोभाचे किंवा (सरकारविषयक) अप्रीतीचे प्रवर्तन करणे | [ S. 5 ] |
| promotion or conduct of a public meeting | सार्वजनिक सभेचे प्रवर्तन किंवा संचालन | [ S. 6 ] |
| public excitement .. | लोकक्षोभ | [ S. 4 (1) ] |
| public meeting .. .. | सार्वजनिक सभा | [ S. 3(1) ] |
| public place .. .. | सार्वजनिक ठिकाण | [ S. 7 ] |
| seditious meetings .. | प्रजाक्षोभक सभा | [ Long title ] |
| speech .. .. | भाषण | [ S. 7 ] |

# प्रजाक्षोभक सभा प्रतिबंध अधिनियम, १९११

## THE PREVENTION OF SEDITIOUS MEETINGS ACT, 1911

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अभिभाषण | address .. | .. [ S. 7 ] |
| अशांतता | disturbance .. | .. [ S. 4(1) ] |
| प्रजाक्षोभक सभा | seditious meetings | .. [ Long title ] |
| प्रजाक्षोभाचे किंवा (सरकारविषयक) अप्रीतीचे प्रवर्तन करणे | promote sedition or disaffection | [ S. 5 ] |
| प्रजाक्षोभाचे प्रवर्तन करणे | promote sedition | .. [ Long title ] |
| भाषण | speech .. | .. [ S. 7 ] |
| लोकक्षोभ | public excitement | .. [ S. 4(1) ] |
| व्याख्यान | lecture .. | .. [ S. 7 ] |
| सार्वजनिक ठिकाण | public place .. | .. [ S. 7 ] |
| सार्वजनिक राबत्याचे ठिकाण | place of public resort | .. [ S. 7 ] |
| सार्वजनिक शांततेला बाध आणणे | cause a disturbance of the public tranquillity | [ S. 5 ] |
| सार्वजनिक शांततेला बाध येणे | disturbance of public tranquillity | [ Long title ] |
| सार्वजनिक सभा | public meeting | .. [ S. 3 (1) ] |
| सार्वजनिक सभेचे प्रवर्तन किंवा संचालन | promotion or conduct of a public meeting | [ S. 6 ] |
| हवालदार | head constable | .. [ S. 4 (2) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई